**<u>अमरावती महानगरपालिका, अमरावती</u>**

**<u>दिनांक 27.3.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय</u>**

**(प्रशासकीय विषय)**

**<u>विषय क्रमांक</u> 71 -** U-CHC (Urban Community Health Centre) स्थापन करणेबाबत व शासनाचा प्रस्ताव सादर करणेबाबत

संदर्भ :- मा.नगरसचिव, महानगरपालिका अमरावती 3 UCHC बाबत दि. 14.12.2022 रोजीचा मंजुर ठराव

**<u>ठराव क्रमांक</u> 71 -** उपरोक्त विषयास अनुसरून दि.15/11/2022 रोजी मा.आयुक्त तथा संचालक यांच्या अध्यक्षतेखाली 15 व्या वित्त आयोगा अंतर्गत व NUHM कामकाजाबाबत VC मध्ये आढावा घेण्यात आलेला आहे.

सन 2011 च्या census नुसार अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकसंख्या 6,48,801 अशी आहे. तरी 2011 च्या लोकसंख्येचा आधार घेता, शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार 2,50,000 लोकसंख्येला 1 UCHC (Urban Community Health Centre) आवश्यक आहे. त्यानुसार VC मध्ये सादर केलेल्या PPT मध्ये एकुण 3 UCHC ची requirement दाखविण्यात आलेली आहे. तरी सद्याच्या वाढीव लोकसंख्येनुसार 3 UCHC स्थापन करण्याच्या बाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

तरी त्या अनुषंगाने मा.आयुक्त, मनपा अमरावती यांनी संदर्भ क्रं.4 नुसार दि. 2/11/2022 रोजी सर्व विभाग प्रमुख याची आढावा सभा घेतली, सदर सभेमध्ये शिक्षण विभाग, बांधकाम विभाग, ADTP विभाग तसेच सर्व झोन engineers व सहाय्यक आयुक्त उपस्थित होते. त्यांच्या समक्ष UCHC चा प्रस्ताव तसेच Polyclinic बाबत चर्चा झाली असून, U-CHC स्थापन करण्याच्या जागेबाबत सर्वानुमते चर्चा करण्यात आलेली आहे, व खालीलप्रमाणे जागा मान्य करण्यात आल्या, त्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे आदेश मा.उपायुक्त (प्रशा.), मा.सहाय्यक संचालक, नगर रचना, मा. शहर अभियंता, मा.उपअभियंता (सर्व) यांना मा.आयुक्त यांनी सभेमध्ये दिलेले आहेत.

तरी दि.14/12/2022 रोजी UCHC तारखेडा, UCHC अंबिका नगर, UCHC रहाटगाव करीता स्थायी समिती मध्ये ठराव झालेला होता. तरी सदर ठराव रद्द करण्यात यावा व नव्याने UCHC 3 करीता अनुक्रमे 1) तारखेडा, 2) रहाटगाव, 3) मोदी हॉस्पीटल, बडनेरा करीता सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त करणे करीता प्रशासकीय विषय सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास व करारनाम्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

| | | |
|---|---|---|
| **स्वा./-**<br>**नगरसचिव,**<br>**महानगरपालिका,अमरावती** | नगरसचिव<br>महानगरपालिका, अमरावती | **स्वा./-**<br>**प्रशासक,**<br>**महानगरपालिका,अमरावती** |